**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक १९.०५.२०२६ मंगळवार**

**(कामगिरी)**

**परिमंडळ क. १, विशेष पथक व हिंगणा पोलीसांची कामगिरी :— प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक १९.०५.२०२६ चे ०१.४५ वा. ते ०१.५१ वा. चे दरम्यान, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क. १ चे विशेष पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे हिंगणा हद्दीत, प्लॉट क. १२३, सुरज नगर, हिंगणा येथे राहणारे सतिष मणियार यांनी त्यांच्या घराचे तळमजल्यावरील भाड्याने दिलेल्या गोडावूनमध्ये पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी हिराभाऊ उर्फ दीपक मुकूंदराव मेंढे, वय ५२ वर्ष, रा. वार्ड क. ४, जामा मस्जिद जवळ, रायपूर, ता. हिंगणा जि. नागपूर हा आपले ताब्यातील किरायाने घेतलेल्या गोडावूनमध्ये शासनाने प्रतिबंधीत केलेले वेगवेगळे कंपनीचे वेगवेगळे व फ्लेवरचे तंबाखुजन्य पदार्थ साठवणूक करुन बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीस मुद्येमालाबाबत विचारपुस केली असता, त्याने तो मुद्येमाल विक्रीकरीता साठवून ठेवल्याचे सांगितले. आरोपीचे ताब्यातुन शासनाने प्रतिबंधीत केलेले वेगवेगळे कंपनीचे व फ्लेवरचे तंबाखुजन्य पदार्थ मॅनगोल्ड सुगंधी तंबाखु, ईगल सुगंधी तंबाखं, गोल्डन सफारी सुगंधी तंबाखु, होले सुगंधी तंबाखु, जनम सुगंधी तंबाखु, रिमझीम सुगंधी तंबाखु, मोरपंख सुगंधी तंबाखु, व्ही १ सुगंधी तंबाखु, माजा सुगंधी तंबाखु, सागर सुगंधी तंबाखु तसेच, विमल पानमसाला असा किंमती अंदाजे ४,६५,३२०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता शासनाने प्रतिबंधीत केलेला तंबाखुजन्य पदार्थ बेकायदेशीर अवैधरित्या विक्रीकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीविरूध्द पोलीस ठाणे हिंगणा येथे कलम १२३, २७४,२७५,२२३ भा.न्या.सं. सहकलम २६(१),२६(२)(iv),२७(३)(e),३०(२)(a),३(१)(zz)(iv),५९ अन्न सुरक्षा मानके अधिनियम २००६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीस मुद्देमालासह हिंगणा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. शिवाजीराव राठोड, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. सिंगा रेड्डी ऋषिकेश रेड्डी, पोलीस उप आयुक्त (परि क. १), मा. श्री. सतिशकुमार गुरव, सहा. पोलीस आयुक्त (एमआयडीसी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि जितेंद्र बोबडे, पोहवा कैलास चव्हाण, सुभाष मुंडले, चेतन बुधबावरे, नापोअ अतुल तलमले, पोअ. स्वप्निल करंडे, ऋषभ भातुलकर,

कार्तिक हेडाऊ, अरविंद राठोड, मपोअं. दीपाली, शिला असे परिमंडळ क्र. १ चे विशेष पथक तथा पोलीस ठाणे हिंगणा येथील अधिकारी व अंमलदार यांनी संयुक्तिकरित्या केली.

**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे राणा प्रतापनगर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

फिर्यादी गणेश केशवराव वडोदकर, वय ६७ वर्षे, रा. प्लॉट नं. ०९, त्रिशरण नगर, खामला, पोलीस ठाणे राणा प्रतापनगर, नागपुर हे सन २०१७ साली कामगार राज्यविमा निगम, गणेशपेठ, नागपूर येथून जॉईन्ट डायरेक्टर या पदावरुन सेवानिवृत्त झाले आहेत. दिनांक १८.०५.२०२६ चे १८.४५ वा. ते २२.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी हे आपले राहते घराला कुलुप लावुन, लग्नाचा वाढदिवस साजरा करण्यास पत्नीसह खरेदी तथा दुर्वा हॉटेल, सिताबर्डी येथे जेवण करण्याकरीता गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील आलमारीतील रोख ६०,०००/— रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने, तीन घड्याळी व इतर कागदपत्रे असा एकुण किंमती ७,८३,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे राणा प्रतापनगर येथे सपोनि. आप्पासो पडळकर ९४२०६९५१९१ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५,३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे राणाप्रतापनगर</u>:—** दिनांक १८.०५.२०२६ चे १६.४५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे राणाप्रतापनगर हद्दीत, प्रिमीयम टेक्नॉलॉजी ग्रुप बिल्डींगचे वॉल कंपाऊंड भिंतीलगत, व्हीआयपीएल बिल्डींगसमोर, आयटी पार्क रोड, नागपूर येथे एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे, रंग—गोरा, चेहरा —गोल, बांधा—सडपातळ, डोक्याचे केस काळे, डावे डोळयाला जखम, दाढी बारीक, दाढी मिशी वाढलेली व काळी, अंगात निळया—पांढ—या, कत्था रंगाचे चौकडीचे फुलबाहीचे शर्ट व निळया रंगाचा पॅन्ट तसेच पायात निळया रंगाची चप्पल घातलेली, ओळख—उजवे हाताचे बोटात दोन सिल्व्हर धातुच्या अंगठया, उजवे हाताचे पंजावर ओम असे गोंदलेले तसेच गळयात पिवळया धातुची बारीक चेन घातलेल्या, वर्णनाचे ईसम बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद वर्णनाचे मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे राणा प्रतापनगर येथे संपर्क साधावा.

यापकरणी सरतर्फे फिर्यादी मपोअ. हेमलता हरदे यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे राणा प्रतापनगर येथे पोउपनि. एस.बी.गोबाळे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे बेलतरोडी</u> :—** धनश्री अमृत निमजे, वय २६ वर्षे, रा. तायवाडे नगर, सोमनाथ पॅलेस, प्लॉट नं. १०१, बेलतरोडी, नागपूर ही दिनांक ०७.०५.२०२६ चे १२.०० वा. पासुन पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीतुन, राहते घरून ''ईन्टरव्यु करीता बॅगलोर येथे जाते'' असे सांगुन कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— मजबुत, उंची— ५ फुट १ इंच, केस— काळे लांब, अंगात— जिन्स पॅन्ट व शर्ट घातलेले आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलते.

**<u>२) पोलीस ठाणे सक्करदरा</u> :—** कु. अप्रुशा कुंडलीक ठाकरे, वय २५ वर्षे, रा. दत्तात्रय नगर, महाकाळकर सभागृह समोर, नागपूर ही दिनांक १७.०५.२०२६ चे ०९.०० वा. पासुन पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीतुन, राहते घरून ऑफीसला जाते असे सांगुन, सोबत लाल रंगाची अॅक्टीवा मोपेड क्र. एम.एच.४० ए.एल. १९३७ घेवुन कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची— ४ फुट ५ इंच, केस— काळे लांब, अंगात— काळ्या रंगाचा शर्ट व पॅन्ट तसेच, पायात ग्रे रंगाचा बुट घातलेले आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलते.

**<u>३) पोलीस ठाणे यशोधरानगर</u> :—** दीपक नरेश साठवणे वय ३४ वर्षे, रा. राजगृह नगर, कपीलनगर, नारी, नागपूर हे दिनांक १४.०५.२०२६ रोजी पासुन पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीतुन, राहते घरुन एचसीजी कॅन्सर हॉस्पिटल येथे गेले होते, घरी परत आले नाहीत. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— मध्यम, उंची— ५ फुट ४ इंच, केस— काळे, अंगात— पिवळा शर्ट व निळा जिन्सपॅन्ट घातलेला आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलतात.



धनश्री



अप्रुशा



दीपक

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उपनिरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

## <u>वाहतुक शाखेची प्रेसनोट</u>

वाहतूक परिमंडळ कॉटन मार्केट हद्दीत बडकस चौक ते गांधीपुतळा चौक हा अतिवर्दळीचा असुन गांधीपुतळा चौक कडुन बडकस चौकाकडे जातांना भरपुर दुकाने आहेत, तेथे दररोज जास्त प्रमाणात लोक खरेदी करीता येतात. तेथे नो—पार्कीग असल्याने खरेदी करीता येणारे ग्राहकांचे वाहनावर टोईंग व्हॅन द्वारे कार्यवाही केली जाते, त्यामुळे लोंकाना विनाकारण त्रास होतो. त्यामुळे तेथे सिंगल लाईन टु व्हीलर पार्कीगबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

**गांधीपुतळा ते बडकस चौक रोडवरील टायटन शोरूम ते मिंटो मे झेरॉक्स दुकानासमोरील जागेवर सिंगल लाईन टु व्हिलर पार्कींग देण्यात येत आहे.**

- टायटन शोरूम ते मिंटो मे झेरॉक्स समोरील दुकानासमोर नो—पार्कींगचे बोर्ड काढुन सिंगल लाईन फक्त टु व्हीलर पार्कींग करण्यात येत आहे.

**सदरची अधिसूचना दिनांक २०.०५.२०२६ ते पुढील आदेशापर्यंत अमंलात राहील.**

तरी नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

**स्वा/–**

**( लोहित मतानी, भापोसे )**

पोलीस उप आयुक्त, वाहतूक,

नागपूर शहर